# प्रेस नोट - मर्डर केस (डॉ.दा.भ.मार्ग पो.ठाणे)

**डॉ.दादासाहेब भडकमकर मार्ग पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्र. ३६३/२०२२, कलम ३०२ भा.द.वि. या गुन्हयात आरोपीतास अटक केलेबाबत .**

फिर्यादी नामे श्री मनोहर गजानन पवार , वय ३५वर्ष, धंदा- चालक, रा.ठी.रूम नं ३, बॉम्बे गॅरेज जवळ, दादी सेठ लेन, मेहर बिल्डींग च्या मागे, बाबुलनाथ मुंबई ४०००0७. यांचे वडील नामे गजानन रामचंद्र पवार, वय ५५ वर्षे यांचा अज्ञात इसमाने दिनांक २१/०६/२०२२ रोजी ०१.१७ वाजताच्या सुमारास गिरगांव चौपाटी येथील कबुतरखाना जवळ, गिरगांव, मुंबई या ठिकाणी त्यांच्या डोक्यात दगड मारून त्यांचा खुन केला म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

संशयीत इसमाचा कोणत्याही प्रकारचा ठावठिकाणा नसतांना गुन्हयाचा तपास चालू होता. त्याअनुषंगाने सीसीटीव्ही फुटेज व रेल्वे सीसीटीव्ही फुटेज व इतर ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेज यांच्या केलेल्या पाहणीवरून सदरचा संशयीत इसम हा बांद्रा रेल्वे स्थानकातुन पश्चिमेस बाहेर पडताना दिसत होता. प्राप्त सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीताचा फोटो डेव्हलप करून साधारण ०८ ते १० दिवसापासुन सदर इसमाचा बांद्रा (पश्चिम) व आजुबाजुच्या परिसरात शोध चालु केला होता. सदर संशयीत इसमाचा फोटो रस्त्यावर राहणा-या ब-याच इसमांना दाखविण्यात आला होता. त्यांच्याकडुन संशयीत इसमासारखा इसम कचरा गोळा करण्याचे काम करतो अशी प्राथमिक माहिती प्राप्त झाली होती. गरीब निराधार इसमांना बांद्रा परीसरातील ‘हॉटेल बालाजी’ हिल रोड या परिसरात काही सामाजिक कार्यकर्त्यामार्फत मोफत जेवण दिले जात असल्याची माहिती प्राप्त झाली होती. व सदर ठिकाणी काही कचरा गोळा करणारे इसम देखील जेवण करण्याकरीता येतात असे समजले होते. त्याअनुषंगाने डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने हिल रोड बांद्रा या परीसरात वेगवेगळया ठिकाणी सापळे लावले होते.

दि.०३/०७/२०२२ रोजी रात्रौ २०.०० वाजताच्या दरम्यान संशयीत इसमासारखा दिसणारा एक इसम तेथे मिळुन आल्याने पोलीस पथकाने लावलेल्या सापळयाप्रमाणे त्यास त्या ठिकाणी शिताफीने ताब्यात घेतले. व त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरज रामसेवक यादव, वय २३ वर्षे असल्याचे सांगितले. नमुद इसमाकडे अधिक चौकशी केली असता, प्राथमिक स्वरूपात त्याचा गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने त्यास आधिक चौकशीकरिता पोलीस ठाणेस आणले व त्याच्याकडे गुन्हयाचे संदर्भात चौकशी /तपास केला असता त्याचा गुन्हयातील पुर्ण सहभाग स्पष्ट झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर इसमास विश्वासात घेवून त्याच्याकडे आत्तापर्यंत चौकशीत त्याने दिलेल्या माहितीनुसार गोवा राज्य येथे अशाच प्रकारे डोक्यात दगड मारून त्याने एका इसमाचा खुन केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्याबाबत तेथील पोलीसांना संपर्क केला असता तेथील पोलीस पथक मुंबई येथे चौकशी करीता निघाले आहेत. अशा प्रकारे डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाण्याच्या पोलींसानी मा. वरिष्ठांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार गुन्हयासबंधाचा आरोपीताचा कोणत्याही प्रकारचे नाव, पत्ता व ठावठिकाणा माहित नसतांना अतिशय कार्यक्षमतेने व उत्कृष्ठ व कौशल्यरित्या तपास करून सदर गुन्हयात नमुद आरोपी अटक करून गुन्हा उघडकीस आणला.

**अटक आरोपीताचा तपशिल :-**

सुरज रामसेवक यादव, वय २३ वर्षे, धंदा- भंगार गोळा करणे, सध्याचा पत्ता :- बालाजी हॉटेल समोरील फुटपाथ, हिल रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई
मुळ गावचा पत्ता- ग्राम नवलपुर,वार्ड क्र ०१, जिल्हा शाहडोल, राज्य मध्यप्रदेश

अटक आरोपीतास दि. ०४/०७/२०२२ रोजी रिमांडकामी मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता त्यास दि. ०८/०७/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत.

सदर गुन्हयाच्या तपास कार्यवाहीत श्री. दिलीप सांवत, मा.अप्पर पोलीस आयुक्त,द.प्रा.वि, मुंबई, श्री. निलोत्पल, मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ ०२, मुंबई, गिरगाव विभागाचे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. रवी सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.दा.भ. मार्ग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप खुडे, पोलीस निरीक्षक श्री. पांडुरंग सणस (गुन्हे), पोलीस निरीक्षक नितीन महाडीक, सहा. पोलीस निरीक्षक राजाराम पोळ, सहा.पोलिस निरीक्षक डिगे, पोउनि. अभिजीत देशमुख, पोउनि. झाडे, पो.ह. अशोक पाटील, पो.शि.कोळी, पो.शि.डावरे, पोशि. कदम यांनी चांगली उत्कृष्ट कामगीरी केली आहे. सदर गुन्हयाचा पूढील तपास सुरू आहे.

------०------